सकाळ

# लोणावळ्यामध्ये आजपासून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

**लोणावळा, ता. २३ :** सहाव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास 'लिफ्फी २०२१' उद्यापासून (ता. २४) सुरुवात होणार आहे. ऑनलाइन होणाऱ्या या चित्रपट महोत्सवात प्रसिद्ध निर्माते शक्ती सामंता यांना श्रद्धांजली अर्पण करून, त्यांचे काही चित्रपट ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केले जातील, अशी माहिती महोत्सवाचे संचालक महेश तोडी यांनी दिली.

महोत्सवाच्या संचालनाची जबाबदारी तोडी यांच्याकडे आहे. महोत्सवाचे कार्यक्रम प्रमुख (क्यूरेटर) म्हणून विवेक वासवाणी असतील. २४ ते २६ सप्टेंबर, १ ते ३ ऑक्टोबर आणि ८ ते १० ऑक्टोबर दररोज सायंकाळी सहाला शक्ती सामंता यांचे गाजलेले चित्रपट या महोत्सवात प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

महोत्सवात दाखवल्या जाणाऱ्या चित्रपटांना अभिजात दर्जा का आणि कसा मिळाला, याच्या ठळक कारणांचा माग घेणाऱ्या चर्चेत आशिम सामंता, संदिप सोपारकर, पूजा देसाई, ब्रह्मानंद सिंह, ज्योतीन गोयल, तुषार भाटिया, दिव्य सोलगमा आदी सहभागी होणार असल्याचे तोडी म्हणाले. गेल्या वर्षीही महोत्सवाचे आयोजन ऑनलाइनच करण्यात आले होते. त्यालाही प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता.